आपल्या परिसरातील आंब्याच्या गावठीण वाणाचा अभ्यास

उद्देश- आंब्याचे आपल्या परिसरातील निरनिराळे वाण जमा करणे

साहित्य- चार्ट, पेन,अनुभवी व्यक्तिंची मदत

वेळ- संध्याकाळी किंवा सुट्टीचा दिवस

आपल्या भारतात साधारणतः एक हजार आंब्याचे वाण असण्याचा अंदाज आहे. आपापल्या परिसरात आढळणाऱ्या या निरनिराळे आंब्यांचे वाण त्याच्या गुणवैशिष्ट्यावरून त्या- त्या नावाने ओळखली जातात.
जसे- केसर, गोटी, झिपरी इ. ही नावे प्रामुख्याने आंब्याची चव, आकार, केसर,उपयोग आदिवरून पडल्याचे दिसते. अशी निरनिराळी वाणं शोधण्याचा उपक्रम मुलांना आंब्याच्या अनेक वाणांची माहिती करून देण्यास उपयोगी ठरेल.

आंब्याच्या वाणाचे संकलन करण्यासाठीचा नमुना चार्ट

आंब्याचे नाव	त्याचे विशेष गुण / वर्णन	झाडांची संख्या	आठळणाऱ्या ठिकाणांची नावं